आॅपरेशन प्रहार अंतर्गत माना पोलिसांचा धडाका! >>पान 2

तुम्ही रानातले डुकरं हाकला मी राजकारणातले हाकलतो : रविकांत तुपकर >>पान 3

वैचारिक प्रबोधनाचे लोकनाट्य दर्शन: ''लग्नाची केली घाई, जीव गेला बाई'' ने रसिकांचे हृदय हेलावले! >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

सुविचार
जीवनात नेहमी प्रामाणिकपणे वागा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



अनु मलिक यांच्या विरोधात बोलल्यामुळे काम मिळाले नाही: अलिशा चिनॉय
आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 72 ■ मंगळवार, दि. 07 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या

# नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी नगर विकास विभागांचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, उपसचिव प्रियांका कुलकर्णी, छापवाले, उपसचिव विद्या हम्पय्या, अनिरुद्ध जेवळीकर, यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील २४७ नगरपरिषदेपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी व ११ पदे अनुसूचित जमातीसाठी आणि ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. तर १३६ पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

**नगरपरिषद आरक्षण पुढील प्रमाणे नगर परिषदांमधील अनुसूचित जातीसाठी आरक्षित पदे (एकूण ३३ पदे)**

**अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित नगरपरिषद (१७ पदे)**

१. देऊळगाव राजा, २. मोहोळ, ३. तेल्हारा, ४. ओझर, ५. वाना डोंगरी (नागपूर), ६. भुसावळ, ७. घुग्घुस, ८. चिमूर, ९. शिर्डी, १०. सावदा, ११. मैंदर्गी, १२. डिगडोह(देवी), १३. दिग्रस (यवतमाळ), १४. अकलूज, १५. परतूर, १६. बीड, १७. शिरोळ

**अनुसूचित जाती प्रवर्गासाठी (सर्वसाधारण) आरक्षित नगरपरिषद (१६ पदे)**

१. पांचगणी, २. हुपरी, ३. कळमेश्वर, ४. फुरसुंगी ऊरुळी-देवाची, ५. शेगांव, ६. लोणावळा, ७. बुटीबोरी, ८. आरमोरी, ९. मलकापूर, जि.सातारा, १०. नागभिड, ११. चांदवड, १२. अंजनगांवसूर्जी, १३. आर्णी, १४. सेलू, १५. गडहिंग्लज, १६. जळगांव-जामोद,

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित नगर परिषदा**

अनुसुचित जमातीसाठी एकूण ११ पदांपैकी ६ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत.

**अनुसुचित जमाती महिलांसाठी आरक्षित (६ पदे)**

१. पिंपळनेर, २. शेंदूरजनाघाट, ३. भडगांव, ४. यवतमाळ, ५. उमरी, ६. वणी

**अनुसुचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग (५ पदे)**

१. पिंपळगांव-बसवंत, २. राहुरी, ३. एरंडोल, ४. अमळनेर, ५. वरुड

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी नगर परिषदा**

एकूण २४७ नगरपरिषदांमधून ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.



**नागरिकांचा मागास प्रवर्गातील (सर्वसाधारण) आरक्षित पदे (३३ पदे)**

१. तिरोडा, २. वाशिम, ३. भद्रावती, ४. परांडा, ५. नंदुरबार, ६. खापा, ७. शहादा, ८. नवापूर, ९.त्र्यंबक, १०. कोपरगांव, ११. मंगरुळपीर, १२. कन्हान-पिंपरी, १३. पाथर्डी, १४. रामटेक, १५, नशिराबाद, १६.पालघर, १७. वरणगांव, १८. मलकापूर, जि.बुलडाणा, १९. इस्लामपूर, २०. मोहपा, २१. तुमसर, २२. महाड, २३. राहता, २४. श्रीवर्धन, २५. ब्रम्हपूरी, २६. दर्यापूर, २७. वैजापूर, २८. गोंदिया, २९. सांगोला, ३०. वर्धा, ३१. येवला, ३२. कंधार, ३३. शिरपूर-वरवाडे.

**नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदे (३४ पदे)**

१. धामणगांव रेल्वे, २. भोकरदन, ३. भगूर, ४. मालवण, ५. वरोरा, ६. हिंगोली, ७. मोर्शी, ८. उमरेड, ९. हिवरखेड, १०. बाळापूर, ११. शिरुर, १२. कुळगांव-बदलापूर, १३. देगलूर, १४. नेर-नबाबपूर, १५. धाराशिव, १६. इगतपूरी, १७. माजलगांव, १८. मुल, १९. बल्लारपूर, २०. जुन्नर, २१. कुर्डूवाडी, २२. औसा, २३. मुरुड-जंजिरा, २४. अकोट, २५. विटा, २६. चोपडा, २७. सटाणा, २८. काटोल, २९. दौंड, ३०. रोहा , ३१. देसाईगंज, ३२. पुलगांव, ३३. कर्जत, जि.रायगड, ३४. दोंडाईचा-वरवाडे.

>> पान ३

**खुला प्रवर्ग (सर्वसाधारण)**

१ फलटण, २ अहमदपूर,३ पाथरी, ४ चाळीसगांव, ५ तळोदा, ६ वाई, ७ नांदगांव,८ जयसिंगपूर, ९ निलंगा, १० लोहा, ११ खोपोली, १२ राजगुरूनगर १३ कराड, १४ जेजुरी, १५ उमरगा, १६ आळंदी, १७ पुसद, १८ बारामती १९ जत, २०. पारोळा, २१ तळेगांव-दाभाडे, २२ सासवड, २३ गडचांदुर, २४ रिसोड, २५ वेंगुर्ला, २६ पातूर, २७ किल्लेधारुर, २८ चिखली, २९ मेहकर, ३० दारव्हा, ३१ सिल्लोड, ३२ सिन्नर, ३३ देवळी, ३४ मुरूम, ३५ वडगांव, ३६ महाबळेश्वर, ३७ आष्टा, ३८ दुधणी, ३९ कुंडलवाडी, ४० खुलताबाद, ४१ नरखेड, ४२ राजूरा, ४३ सिंदखेडराजा, ४४ वाडी, ४५ डहाणू, ४६ देवळाली-प्रवरा, ४७ कामठी, ४८ अक्कलकोट, ४९ सातारा, ५० भोर, ५१इंदापूर, ५२ चिपळून, ५३ माथेरान, ५४ श्रीगोंदा, ५५ श्रीरामपूर, ५६ मनमाड, ५७ नळदुर्ग, ५८ भोकर, ५९ बिलोली, ६० अंबेजोगाई, ६१जिंतूर, ६२ सोनपेठ, ६३ गंगापूर, ६४ पांढरकवडा, ६५ घाटंजी, ६६ मुर्तीजापूर, ६७ चिखलदरा, ६८ तुळजापूर.

**खुला प्रवर्गातली महिलांसाठी नगरपरिषदा**

१. परळी-वैजनाथ, २. मुखेड, ३. अंबरनाथ, ४. अचलपूर,५. मुदखेड ६. पवणी ७. कन्नड, ८. मलकापूर, जि.कोल्हापूर, ९. मोवाड, १०. पंढरपूर, ११. खामगांव, १२.गंगाखेड, १३. धरणगांव, १४. बार्शी, १५. अंबड, १६. गेवराई, १७. म्हसवड, १८.गडचिरोली, १९. भंडारा, २०. उरण, २१. बुलडाणा, २२. पैठण, २३. कारंजा, २४. नांदुरा, २५.सावनेर, २६. मंगळवेढा, २७. कळमनूरी, २८. आर्वी, २९. किनवट, ३०. कागल, ३१. संगमनेर, ३२ मुरगुड, ३३ साकोली, ३४ कुरुंदवाड, ३५ पुर्णा, ३६ कळंब, ३७ चांदुररेल्वे, ३८ चांदुरबाजार, ३९ भुम, ४० रत्नागिरी, ४१ रहिमतपूर, ४२ खेड, ४३ करमाळा, ४४ वसमत, ४५ हिंगणघाट, ४६ रावेर, ४७ जामनेर, ४८ पलुस, ४९ यावल, ५० सावंतवाडी, ५१ जव्हार, ५२ तासगांव, ५३ राजापूर, ५४ सिंधीरेल्वे, ५५ जामखेड, ५६ चाकण, ५७ शेवगांव, ५८ लोणार, ५९ हदगांव, ६० पन्हाळा, ६१ धर्माबाद, ६२ उमरखेड, ६३ मानवत, ६४ पाचोरा, ६५ पेण, ६६ फैजपूर , ६७ उदगीर, ६८ अलीबाग.

# बिहारमध्ये दोन टप्प्यात विधानसभा निवडणुका

**६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान, १४ नोव्हेंबरला निकाल**

पाटणा : अवघ्या देशाचे लक्ष लागून असलेल्या बिहार निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाचे प्रमुख ज्ञानेश कुमार यांनी बिहारच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. बिहारच्या निवडणुका या दोन टप्प्यात होणार आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान हे ६ नोव्हेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान हे ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या निवडणुकीचा निकाल १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

पहिल्या टप्प्यातील निवडणूक ही ६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. तर दुसऱ्या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १० ऑक्टोबर आणि १३ ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.

बिहार निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही १७ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २० ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल.

अर्जांची छाननी ही १८ ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २१ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) रोजी होणार.

अर्ज मागे घेण्याची मुदत ही २० ऑक्टोबर (पहिला टप्पा) आणि २३ ऑक्टोबर (दुसरा टप्पा) असेल.

मतदान -
पहिला टप्पा - ६ नोव्हेबर
दुसरा टप्पा - ११ नोव्हेंबर
निवडणुकीचा निकाल - १४ नोव्हेंबर

बिहारमध्ये आम्ही सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. त्याचसोबत सर्व निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी आणि इतर सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, यावेळी बिहारच्या निवडणुका सुरळीत आणि सोप्या पद्धतीने होतील. निवडणुकीसाठी आम्ही बिहारच्या जनतेचे सहकार्य अपेक्षित करतो. बिहारमध्ये एकूण ७ कोटी ४२ लाख मतदार आहेत. त्यापैकी ३ कोटी ९२ लाख पुरुष आणि ३ कोटी ५० लाख महिला मतदार आहेत. १४ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करतील. प्रत्येक मतदान केंद्रावर १,२०० मतदार असतील.

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, मतदानाच्या १० दिवस आधीपर्यंत नावे नोंदवता येतील. एसआयआरच्या माध्यमातून अंतिम यादी ३० सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात आली. निवडणुकीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल.

# एमपीएससीकडून ९३८ जागांसाठी नवी जाहिरात, महाराष्ट्र गट-क सेवेची पूर्व परीक्षा 'या' दिवशी होणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. एमपीएससीकडून महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या जाहिरातीद्वारे ९३८ पदांच्या भरतीसाठी पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा ४ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उद्योग निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक आणि लिपीक टंकलेखक पदाच्या भरतीसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे.उद्योग निरीक्षक पदाच्या ९ जागा भरल्या जाणार आहेत. तांत्रिक सहायक पदाच्या ४ जागा, कर सहायक ७३ जागा आणि लिपिक टंकलेखक पदाच्या ८५२ जागांसाठी ही परीक्षा आयोजित केली जाणार आहे. महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सुरुवात ७ ऑक्टोबरला दुपारी १ वाजता होईल. तर, अर्ज सादर करण्याचा अखेरचा दिनांक २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत असेल. ऑनलाईन शुल्क देखील २७ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत स्वीकारलं जाणार आहे. तर, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत चलनाद्वारे शुल्क भरणार असल्यास ते २९ ऑक्टोबर रात्री २३.५९ वाजेपर्यंत घेता येईल. त्यानंतर ३० ऑक्टोबरला कार्यालयीन वेळेत स्टेट बँकेच्या शाखेत चलन भरावं लागणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट क सेवा परीक्षेला अर्ज करणारा उमेदवार भारतीय असणं आवश्यक आहे. उद्योग निरीक्षक, गट-क संवर्ग वगळता इतर संवर्गासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता उमेदवाराकडे असणं आवश्यक आहे. उद्योग निरीक्षक पदासाठी उमेदवाराकडे सांविधिक विद्यापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील किमान पदविका, किंवा विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी असणं गरजेचं आहे.

# नगराध्यक्षपदासाठी किशोर गारोळे आघाडीवर

## आमदार सिद्धार्थ खरात यांचे नेतृत्व शिवसेनेच्या विजयाचा पाया!

## तडजोड नाही, विकासासाठी निर्धार किशोर गारोळे शिवसेनेच्या उमेदवारीसाठी आघाडीवर

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/कार्यालय प्रतिनिधी** : आगामी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेहकर शहरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध पक्षांची रणनीती, कार्यकर्त्यांची हालचाल आणि मतदारांचा कल पाहता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख किशोर गारोळे हे नगराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. त्यांच्याबाबत पक्षांतर्गत तसेच जनतेमध्ये उमेदवारीसाठी सकारात्मक वातावरण तयार झालं असून, त्यांच्या पाठिशी आमदार सिद्धार्थ खरात यांचं खंबीर नेतृत्व असल्याने हा लढा अधिकच प्रभावी बनला आहे.

मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघातून नुकतेच निवडून आलेले आमदार सिद्धार्थ खरात यांनी अल्पावधीतच आपल्या प्रभावी कार्यशैलीमुळे संपूर्ण मतदारसंघात विश्वास निर्माण केला आहे. गावागावात





थेट संपर्क, जनतेच्या समस्या समजून घेण्याची तत्परता, आणि प्रशासनाशी समन्वय साधून तात्काळ निर्णय घेण्याची शैली यामुळे खरात यांचं नेतृत्व हे केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही महत्वाचं ठरत आहे.

त्यांनी अनेकदा स्पष्टपणे सांगितलं आहे की, ''मेहकर नगर परिषद शिवसेनेच्या ताब्यात आली, तर विकासाचं नवं पर्व सुरू होईल.'' ही भूमिका आणि भूमिकेमागचा आत्मविश्वास, कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना नव्या आशेने भारित करत आहे.

किशोर गारोळे सर्वसामान्यांचा चेहरा, विश्वासार्ह उमेदवार शहरातील विविध घटकांमध्ये लोकप्रिय असलेले किशोर गारोळे हे एक संयमी, सर्वधर्मसमभाव बाळगणारे आणि समर्पित कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. गारोळे यांनी अनेक वर्षे समाजकार्य आणि पक्षनिष्ठा या दोन्ही आघाड्यांवर आपली छाप सोडली आहे. कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता, सर्वांसोबत मिसळणं आणि त्यांच्या अडचणीला आपल्या कुटुंबातील विषय मानून वागणं, ही त्यांची खासियत ठरली आहे.

त्यांच्या भोवती एक स्वच्छ आणि विश्वासार्ह प्रतिमा उभी राहिलेली असून, त्यांना महाविकास आघाडीतील इतर घटक पक्षांचा, विशेषतः स्थानिक मुस्लिम समाजाचा आणि काँग्रेसमधील काही वरिष्ठ नेत्यांचा देखील पाठिंबा मिळत असल्याची माहिती आहे.

या निवडणुकीत एक महत्त्वाचा राजकीय संकेत स्पष्टपणे दिसून येतो खरात यांचं नेतृत्व + गारोळे यांची लोकाश्रयित प्रतिमा = शिवसेनेचा विजय. हा फॉर्म्युला मेहकरकरांनी स्वीकारलेला दिसतोय. नागरिकांमध्ये ''आता कुणीही नाही, आपलंच माणूस किशोर गारोळेच हवे!'' अशी भावना उभी राहत आहे.

शिवसेनेच्या गोटात सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लोणार किंवा जिल्हा परिषदेसाठी समन्वयाचा विचार असला तरी मेहकरसाठी कोणतीही तडजोड नको, अशी स्पष्ट भूमिका आमदार खरात यांनी मांडलेली आहे. त्यामुळे मेहकरमध्ये शिवसेनेचं नेतृत्व अधिक ठाम आणि आक्रमक बनले आहे.

'तडजोड नाही विकासासाठी निर्धार' शिवसेनेतर्फे असा संदेश दिला जात आहे की, ''ही केवळ निवडणूक नाही, तर मेहकरच्या भविष्याचा निर्णय आहे. कोणालाही खुश करण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या हितासाठी उमेदवार देण्यात येणार आहे.'' यामुळे स्थानिक पातळीवर पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

आज मेहकरमध्ये जर काही गोष्ट स्पष्टपणे जाणवत असेल, तर ती म्हणजे आमदार सिद्धार्थ खरात यांचं प्रभावी नेतृत्व आणि किशोर गारोळे यांचं सामाजिक बळ ही सांगड शिवसेनेला यंदाच्या निवडणुकीत विजयी ठरवू शकते. केवळ पक्षीय पातळीवर नव्हे, तर विकासाच्या भूमिकेवर लढणाऱ्या या जोडीकडे नागरिक आशेने पाहत आहेत. नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत गारोळे यांचा फॉर्म हाय असून, ही लढत केवळ राजकीय नसून मेहकरच्या नव्या पर्वाची नांदी ठरणार आहे.

## भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी शुभेच्छा !

भारतीय पुरुषांच्या क्रिकेट संघाने दुबईत झालेल्या आशिया चषक स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा धुव्वा उडवत हे अजिंक्यपद मिळवले. या विजयानंतर संपूर्ण देशात दिवाळी साजरी करण्यात आली. अजिंक्यपद मिळवूनही भारतीय संघाने पाकिस्तानच्या नक्वी यांच्याकडून चषक न स्वीकारण्याच्या निर्णय घेतल्याने मोठा वादंग झाला. हा वादंग अजूनही चालू आहे. भारताला सन्मानपूर्वक चषक प्रदान केला जाईल की नाही याकडे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा संघ ५० षटकांच्या म्हणजेच एकदिवसीय विश्र्वचषक खेळतोय आणि हा विश्र्वचषक भारतात होतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही आता हा विश्र्वचषक भारतात असल्याने स्टार स्पोर्ट वाहिनीवर त्याचे थेट प्रेक्षपण चालू आहे पण सामना पाहणाऱ्यांची सख्या कमी आहे. मैदानावर देखील प्रेक्षकांची उपस्थिती कमीच असते. महिला क्रिकेट संघाला प्रयोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांचा संघ ऑस्ट्रेलियात एकदिवसीय आणि टी २० मालिका खेळण्यासाठी जाणार आहे. या मालिकेत भारत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे मात्र भारतात माहिलांचा ५० षटकांचा विश्र्वचषक चालू आहे त्याची मात्र कोठेच चर्चा नाही. याच विश्र्वचषक स्पर्धेत रविवारी भारतीय महिलांनी पाकिस्तानी महिलांचा ८८ धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा एकतर्फी पराभव करूनही महिला संघाचे कौतुक करण्यासाठी कोणी पुढे आले नाही. हेच जर पुरुषांच्या संघाने केले असते तर देशभर दिवाळी साजरी झाली असती. रस्त्यारस्त्यात लोकांनी तिरंगा हातून घेऊन विजयी यात्रा काढल्या असत्या . टीव्ही चॅनलने खेळाडूंच्या कौतुकाच्या २४ तास बातम्या दाखवल्या असत्या. वर्तमानपत्रात भारतीय खेळाडूंच्या कौतुकाचे मथळे छापून आले असते. राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून सर्वांनीच भारतीय संघाचे अभिनंदन केले असते. सोशल मीडियावर संघाच्या कौतुकाचा महापूर आला असता. सर्वांनी आपल्या मोबाईलवरील स्टेटसवर संघाचे व्हिडिओ, फोटो, मिम्स ठेवले असते. सरकारने विजयी संघाला रोख पारितोषिक घोषित केले असते मात्र हीच कामगिरी महिला संघाने केली तर त्यांच्या पदरी काय येते तर उपेक्षा. त्यांच्या या कामगिरीची दखल घ्यावी असे कोणालाही वाटले नाही कारण ही कामगिरी कोणी केली तर महिलांनी. केवळ याच सामन्यात नाही तर आतापर्यंत झालेल्या सर्वच सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला आहे. भारतीय महिलांचा हा संघ बलवान संघ आहे. फलंदाजीत भारतीय संघातील महिला फॉर्मात आहे. कर्णधार हरमनप्रित कौर, स्मृती मानधना, हर्लिन देवल, जेमिना रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, रिचा घोष हे सर्वच फलंदाज फॉर्मात आहे. यातील दोन किंवा तीन फलंदाज जरी चालले तरी भारत हा विश्र्वचषक जिंकू शकेल. गोलंदाजीतही क्रांती गौड, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, रेणुका या जबरदस्त फॉर्मात आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले आहे एकूणच यावेळी भारतीय महिलांना विश्र्वचषक जिंकण्याची चांगली संधी आहे. भारतीय महिलांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारत पहिल्यांदा ५० षटकांच्या विश्र्वचषकावर आपले नाव कोरू शकतो. भारतीय महिलांनी अद्याप कोणताही विश्र्वचषक जिंकलेला नाही. नाही म्हणायला दोन वर्षापूर्वी १९ वर्षाखालील महिलांनी पहिल्यांदा विश्र्वचषकावर नाव कोरले होते. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे ते पहिले विश्र्वविजेतेपद होते. मात्र वरिष्ठ संघाला अशी कामगिरी करता आली नाही. याआधी भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्र्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या वेळी भारतीय महिलांना विश्र्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते आता मात्र हा विश्र्वचषक जिंकून हे अपयश पुसायची संधी या संघाला आहे. देशातील १४५ कोटी जनतेने भारताच्या या महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तर हा संघ देखील ऐतिहासिक कामगिरी करून भारताला विश्वचषक जिंकून देईल. भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी मनापासून शुभेच्छा!

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत माना पोलिसांचा धडाका!

## जुगार आणि अवैध दारूविरोधात संयुक्त कारवाई, तिघे जेरबंद; ₹६३५० चा मुद्देमाल जप्त

**दैनिक आपला विदर्भ**

**माना/प्रतिनिधी:** अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अर्चीत चांडक यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या ''ऑपरेशन प्रहार'' मोहिमेअंतर्गत माना पोलिसांनी आज दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठी धडक कारवाई करत जुगार व अवैध दारू व्यवसायावर संयुक्त हल्ला चढविला आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी तीघा आरोपींवर गुन्हे दाखल करून एकूण ₹६,३५० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.





ग्राम कुरुम येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून राहुल सुरेश चव्हाण (वय ३४, रा. कुरुम) याच्याकडून अंक लिहिलेल्या चिठ्या व ₹७५० रोकड असा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्राम मधापुरी येथे मुन्नीबाई रामराव सोळंके हिच्या घरातून १४ लिटर गावठी दारू (किंमत ₹२,८००) जप्त करण्यात आली.

तसेच ग्राम कुरुम पारधीवाडा येथे रामबाबू रामु पवार (वय ३०) याच्याकडून गावठी दारू व ॲल्युमिनियम डबा (किंमत ₹२,८००) जप्त करण्यात आला. दोन्ही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चीत चांडक, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. बदेली चंद्रकांत रेड्डी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार गणेश नावकार, पोलीस हवालदार दीपक सोळंके व पोलीस शिपाई अगडते यांनी विशेष परिश्रम घेतले होते.माना पोलिसांची ही सलग कारवाई पुन्हा एकदा दाखवते की अवैध दारू आणि जुगारविरोधात पोलीस यंत्रणा कठोर भूमिका घेत आहे. स्थानिक नागरिकांकडून पोलिसांच्या या तत्पर कार्यवाहीचे कौतुक होत आहे.

## राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील अध्यापकांची निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निपक्ष आणि संतुलित व्हावी, यासाठी कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीनुसार विद्यापीठातील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च शिक्षण संस्थांमधील अध्यापकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेनुसार विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी आवश्यक किमान अर्हता आणि उच्च शिक्षणातील दर्जा कायम ठेवण्यासाठीच्या आवश्यक उपाययोजना आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेतील तरतुदी राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. २८ फेब्रुवारी २०२५ च्या शासन

### अध्यापकांच्या भरती प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती निश्चित

निर्णयानुसार अध्यापकांची निवड प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली होती. ही निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित व्हावी यासाठी त्यात सुधारणा करण्यात आली आहे.

सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेल्या अध्यापक व सांविधिक पदांच्या निवड प्रक्रिया नव्या कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यात येणार असून भविष्यात होणाऱ्या सर्व भरती प्रक्रियेसाठी याच कार्यपद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक असणार आहे, असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

याबाबतचा शासन निर्णय www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे.

# अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रम!

## औद्योगिक प्रशिक्षण संस्था आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होणार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग सज्ज आहे. कुशल मनुष्यबळ हे देशाच्या विकासात मोठे योगदान देत असते. सर्वांना व्यावहारिक आणि दर्जेदार शिक्षण देणे, देशातील उद्योग तसेच आवश्यक त्या क्षेत्राला अनुसरून गरजेनुसार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण प्रणाली विकसित करणे, युवक-युवतींचे विकसित माहिति तंत्रज्ञानासह ज्ञान अद्ययावत करणे, काळाच्या मागणीनुसार शिक्षण धोरण तयार करणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागातंर्गत येणाऱ्या सर्व योजना तसेच शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकासाच्या योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे.

राज्यात कौशल्य विकासाच्या योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात आहेत. राज्यातील युवक, युवतींना अधिकाधिक चांगल्या प्रशिक्षणानंतर रोजगार प्राप्त व्हावा यासाठी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचा पदभार घेतल्यापासून विविध निर्णय व योजना राज्यात सुरू करण्यात आल्या असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्राला देशाचे कौशल्य केंद्र म्हणून विकसित करणे ध्येय आहे. आयटीआय हा एक उच्च कौशल्य गुणवत्ता ब्रँड म्हणून प्रस्थापित करून औद्योगिक आस्थापनांच्या सहयोगाने प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधा वाढविणे, प्रतिवर्षी पाच लाख युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पारंपारिक कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणे, यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने कौशल्य अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील युवकांना कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २,५०६ तुकड्यांच्या ''अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे'' उद्घाटन लवकरच ऑनलाईनच्या माध्यमातून होणार आहे.

**प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश**

अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रम कार्यक्रमाचे वैशिष्ठ्य म्हणजे उमेदवारांना त्यांच्या आवडीचा अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. ''प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश'' या तत्त्वावर प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार असून, इच्छुक उमेदवारांना गावात किंवा शहरात जवळच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेता येईल.

**जनतेच्या सूचनांनुसार रोजगाराभिमुख अभ्यासक्रम**

या योजनेत जनतेलाही सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे. नागरिक आपल्या परिसरात कोणते रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू व्हावेत हे सुचवू शकतात आणि शासन त्यांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या अभ्यासक्रमांचा देखील समावेश या योजनेत करणार आहे. यामुळे स्थानिक रोजगाराच्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यास मदत होईल.

**अल्पमुदतीचे अभ्यासक्रम**

या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांच्या कालावधीचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम तरुणांना अल्पावधीत रोजगारक्षम बनविण्यासाठी तयार करण्यात आले असून, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन त्यांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**प्रशिक्षणासोबत स्थानिकांचा सहभाग**

या कार्यक्रमांतर्गत कार्यक्रमाच्या उद्घाटनादिवशी प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर स्थानिक दोन हजार नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. प्रशिक्षणार्थ्यांसोबत स्थानिक युवक, पालक आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग सुनिश्चित करून या कार्यक्रमाला जनसहभागाचे रूप देण्यात येत आहे.

**सेवानिवृत्त शिक्षकांचा सामाजिक सहभाग**

अल्पमुदतीचे हे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्रनिकेतनांमधील सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. हे शिक्षक आपले अनुभव, ज्ञान आणि तांत्रिक कौशल्य समाजासाठी वापरणार असून, सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून शासनाच्या या उपक्रमात योगदान देतील. यामुळे प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थ्यांना अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळेल.

**अभ्यासक्रमाची उपयुक्तता**

या योजनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना एकसमान संधी मिळणार आहे. स्थानिक केंद्रांमधूनच हे प्रशिक्षण उपलब्ध असल्यामुळे प्रवासाचा अडथळा दूर होईल. तसेच महिला उमेदवार, स्वयंरोजगार इच्छुक युवक आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

**लोकसहभागातून घडणार कौशल्य क्रांती**



या उपक्रमाचा उद्देश फक्त प्रशिक्षण देणे नसून, राज्यभरात कौशल्य विकासाची नवी चळवळ उभी करणे हा आहे. शासन, उद्योग, शिक्षक आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नातून ''रोजगारक्षम महाराष्ट्र'' घडविण्याचा संकल्प या योजनेतून पुढे येत आहे.

**आयटीआयचा सर्वांगीण विकास**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना उद्योगजगताशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी संस्था व्यवस्थापन समित्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक सुधारणा सुरू आहेत.

या सर्व उपक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समिती प्रशिक्षक देणार आहेत. तसेच ही समिती प्रमुख म्हणून व्यवस्थापन करणार आहे. तेच मेंटर प्रशिक्षक निवडणार. अभ्यासक्रमसुद्धा स्थानिक परिस्थितीत व गरजेनुसार निवडले जाणार आहे. या समित्यांमध्ये स्थानिक उद्योग प्रतिनिधी, शैक्षणिक तज्ज्ञ, प्रशिक्षण अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सहभागी असतात. समितीमार्फत प्रत्येक संस्थेच्या गरजेनुसार प्रशिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा, उपकरणांचे आधुनिकीकरण आणि अभ्यासक्रमांची उद्योगाभिमुख पुनर्रचना यावर भर दिला जात आहे.

राज्य शासनाने यासाठी ''संस्थात्मक स्वायत्तता आणि उत्तरदायित्व'' या तत्त्वावर आधारित धोरण राबवले असून, प्रत्येक आयटीआयला स्थानिक उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

या माध्यमातून संस्थांना आधुनिक उपकरणे आणि प्रयोगशाळा विकसित करणे, प्रशिक्षकांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा आयोजित करणे, विद्यार्थ्यांसाठी उद्योगांतील ऑन-द-जॉब ट्रेनिंग आणि ॲप्रेंटशीप संधी निर्माण करणे, तसेच संस्थेच्या परिसरात स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लर्निंग लॅब्स आणि ग्रीन कॅम्पस संकल्पना राबविणे, असे विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

संस्था व्यवस्थापन समितीमार्फत प्रत्येक आयटीआयचे वार्षिक कार्य योजनानुसार पुनरावलोकन केले जाते. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, प्रशिक्षणाची गुणवत्ता, परीक्षेतील निकाल आणि उद्योगांत नोकरी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण यांचा नियमित आढावा घेतला जातो. या प्रयत्नांमुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था आता केवळ पारंपरिक व्यवसाय शिक्षणापुरत्या मर्यादित न राहता, आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्य आणि उद्योजकता केंद्र म्हणून विकसित होत आहेत.

**– मंगल प्रभात लोढा**
**मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्रालय, महाराष्ट्र शासन.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

पान १ वरून



## राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत जाहीर

**खुल्या प्रवर्गातील नगर परिषदांचे आरक्षित**

एकूण २४७ पैकी १३६ पदे ही खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असून यापैकी ६८ पदे ही महिलांसाठी राखीव आहेत.

**नगर पंचायतीचे आरक्षण**

राज्यातील १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण आज काढण्यात आले. यामध्ये अनुसूचित जातीसाठी एकूण १८ जागा आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी ९ व सर्वसाधारण साठी ९ पदे आरक्षित आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी १३ जागा असून त्यामध्ये ७ जागा महिलांसाठी व ६ जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण ४० पदे आरक्षित असून त्यामध्ये २० जागा महिलांसाठी व २० जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ७६ जागा असून ३८ जागा महिलांसाठी व ३८ जागा या सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहेत.

**अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव :- महिलांसाठी आरक्षित नगरपंचायती (९ पदे)**

१ .निलडोह, २. गोधनी(रेल्वे), ३. कोरची, ४. बहादुरा , ५. धानोरा, ६. गौंडपिंपरी, ७. ढाणकी , ८. अहेरी , ९. बेसा-पिपळा

**अनुसूचित जाती प्रवर्ग (सर्वसाधारण)**

येरखेडा, कांद्री (कन्हान), भिसी, कुरखेडा, देवरी, माळेगांव(ब्रु.), बिडगांव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा, भातकुली, दहीवडी.

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी राखीव:-**

महिलांसाठी आरक्षित नगर पंचायती (७ पदे)

भिवापूर, अर्जुनी-मोरगांव, सिरोंचा , हिंगणा, समुद्रपूर, पाली, देवळा.

**अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) (६ पदे)**

कोरपणा, कळंब, माणगांव, गोरेगांव, सेलू , सिंदेवाही

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी राखीव (४० पदे)**

**सर्वसाधारण गटासाठी आरक्षित (२० पदे)**

पारनेर, तळा, खानापूर, पालम, मंठा, कोंढाळी, माळशिरस , एटापल्ली, झरी-जामणी, पोंभूर्णा , माहूर, आटपाडी, मालेगांव-जहांगिर, तिर्थपूरी, कणकवली, शिरुर-कासार, विक्रमगड, अकोले , मोखाडा, सुरगणा.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित (२० पदे)**

घनसावंगी, भामरागड, मंचर, पाटोदा, माढा, कळवण, सावली, मानोरा, मारेगांव, आष्टी, जि.वर्धा, तलासरी, वडवणी, पोलादपूर, खालापूर, शिरुर-अनंतपाळ, जाफ्राबाद, चाकूर, आष्टी, जि.बीड, जिवती, कर्जत, जि.अहिल्यानगर.

**खुल्या प्रवर्गासाठी नगर पंचायती (एकूण ७६ पदे)**

खुला (सर्वसाधारण) (३८ पदे)

शेंदूर्णी , साक्री, सालेकसा, कवठे-महांकाळ, देवणी, मोताळा, अर्धापूर, बोदवड, हिमायतनगर, कसई-दोडामार्ग, मुलचेरा, धडगांव-वडफळ्या, कुडाळ, कोरेगांव, दापोली, वाभवे-वैभववाडी, निफाड, चंदगड, चार्मोर्शी, बदनापूर, कारंजा, धारणी, फुलंब्री, हातकणंगले, लोहारा (ब्रु.), मुरबाड, केज, आजरा, संग्रामपूर, खंडाळा, वडूज, देवगड-जमसंडे, नेवासा, मौदा, शिराळा (जि. सांगली), नायगाव, सेनगाव, महागाव.

**खुला प्रवर्गातील महिलांसाठी :- (पदे ३८)**

१. बाभुळगांव, २. मुक्ताईनगर, ३. कुही, ४. देहू, ५. शहापूर, ६. पारशिवनी, ७. वडगांव-मावळ, ८. तिवसा, ९. मंडणगड, १०. शिंदखेडा, ११. लांजा, १२. देवरुख, १३. वाडा, १४. लोणंद, १५. मेढा, १६. जळकोट, १७. दिंडोरी, १८. सडक-अर्जुनी, १९. म्हसळा, २०. नातेपुते, २१. रेणापूर, २२. लाखणी, २३. औंढा-नागनाथ, २४. पाटण, २५. पेठ, २६. कडेगांव, २७. अनगर, २८. महादूला, २९. सोयगांव, ३०. वैराग, ३१. लाखांदूर, ३२. राळेगांव, ३३. गुहागर, ३४. नांदगांव-खडेश्वर, ३५. महाळुंग-श्रीपूर, ३६. वाशी, जि.धाराशिव, ३७. बार्शी-टाकळी, ३८. मोहाडी.

**आरक्षण सोडत पारदर्शकपणे राबविली राज्यमंत्री माधुरी मिसाळ**

राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली, असे सांगून महिला प्रवर्गासाठी आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या भगिनींना तसेच या निवडणुकीसाठी सर्वांना नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुभेच्छा दिल्या.

# तुम्ही रानातले डुकरं हाकला मी राजकारणातले हाकलतो : रविकांत तुपकर

## - अन्यथा महाराष्ट्रात नेपाळची पुनरावृत्ती - महाराष्ट्रात मोठ्या आंदोलनासाठी सज्ज रहा हे तर इंग्रजांच्या औलादीचे सरकार - तुपकर

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडल्याने तो आता जिवंतपणीच मेला आहे, एकीकडे शासन शेतकऱ्याला जगू देत नाही दुसरीकडे निसर्ग त्यातही अन्य जीव हरीण, रोही, डुकरे शेतकऱ्यांच्या पीकावर डल्ला मारतात आता ही डुकरे हाकलली पाहिजे तुम्ही रानातली डुकरे हाकला मी राजकारणातली डुकरे हाकलतो सरकारला असा उपरोधीत टोला मारत यासाठी शेतकऱ्यांनी संघटीत होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन क्रांतीकरी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केले

ते मूर्तिजापूर तालुक्यातील गाजीपुर टाकळी फाट्यावर ५ ऑक्टोबर संध्याकाळी पार पडलेल्या जागर जाहीर सभेत बोलत होते.

मी शेतकऱ्यांसाठी अनेकदा जेलमध्ये गेलो, अकोल्याच्या




जेलमध्ये असताना माझे सर्वात जास्त मित्र झाले, आताही सरकार माझ्या पाठीमागे लागलंय मला तुरुंगात टाकायचा कट सुरु आहे. परंतु मी सरकार पुढे झुकणार नाही शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही हा लढा अधिक तिव्र करणार असून सोयाबीन सोंगणी नंतर एक मोठे आंदोलन महाराष्ट्र भर उभारणार असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनी त्याची आतापासूनच तयारी करण्याच्या सुचना देत शेतकऱ्यांनी ही ठाम भूमिका घेण्याची क्षमता आपल्या मध्ये ठेवली पाहिजे, चेहरा जरी आपल्या सारखा असला तरी खऱ्या अर्थाने हे सरकार इंग्रजांची औलाद आहे, सोयाबीनला लावणी पासून तर काढणी पर्यंत आठ हजार रुपये खर्च येतो आणि भाव तीन हजार मिळतो, या इंग्रज सरकारला वठणीवर आणण्यासाठी क्रांति करावी लागणार, बलिदान द्यावे लागणार, म्हणाले. नेपाळची पुनरावृत्ती करत अशा नेत्यांना कोपऱ्यात नेऊन आणाव्या लागतील असेही ते म्हणाले

वयाच्या बावीसाव्या वर्षी लाल दिवा मिळाला होता परंतू सरकारचे धोरण शेतकरी विरोधी असल्याने लाल दिव्याला लाथ मारली, आपण सर्वांनी साथ दिली तर तुम्हाला न्याय मिळवून देने शक्य आहे शेतकऱ्यांनी एकजूट होऊन आपल्या मागे उभे राहणाऱ्या युवकांची फौज तैयार करा अशी साद उपस्थित शेतकऱ्यांना तुपकर यांनी घातली. यावेळी शेतकरी जागर मंचाचे मनोज तायडे, अजाबराव वहिले, क्रांतिकारी शेतकरी संघटनेतर्फे गाजीपुर येथे आयोजित केलेल्या जागर सभेमध्ये जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर भाऊ गवळी, गावच्या सरपंच मीना सचिन दिवनाले, ज्येष्ठ शेतकरी अजाबराव पाटील वहिले, दशरथ दिवनाले, ज्ञानेश्वर पाटील ठाकरे, श्रीकृष्ण शालिग्राम तवर, फयाजोद्दीन, जकाउल्ला खान आदी प्रामुख्याने उपस्थित होते, तालुकाध्यक्ष शुभम जवंजाळ, प्रवीण पाटील खोत, रामदास भगत, जिल्हा संघटक राहुल वानखडे, जिल्हा उपाध्यक्ष सय्यद रियाज, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर गवळी तसेच मूर्तिजापूर तालुका क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने या सभेचे आयोजन करण्यात आले.

## अनु मलिक यांच्या विरोधात बोलल्यामुळे काम मिळाले नाही: अलिशा चिनॉय

**मुंबई/प्रतिनिधी :** ''मेड इन इंडिया'' या गाण्याने संगीत क्षेत्रात रातोरात आपली ओळख निर्माण करणाऱ्या अलिशा चिनॉयने अलीकडेच १९९६ मध्ये संगीतकार अनु मलिक यांच्यावर केलेल्या लैंगिक छळाच्या आरोपांबद्दल बोलले. या घटनेनंतर तिला इंडस्ट्रीत कोणतेही काम मिळाले नाही असे तिने सांगितले. झूमशी बोलताना अलिशा चिनॉय म्हणाली, ''मला वाटतं की त्यांनी (अनु मलिक) माझे विधान मूर्खपणाचे ठरवून फेटाळून लावले. दुर्दैवाने, त्यावेळी ते पूर्णपणे पुरुषप्रधान जग होते. आता परिस्थिती बदलली आहे; तेही महिलाप्रधान जग आहे. त्यावेळी मी विवाहित होते आणि माझे माजी पती राजेश माझे करिअर सांभाळत होते. त्यांनी माझ्या विधानाचे समर्थन केले.'' अलिशाने असेही उघड केले की राजेशनेच तिला बोलण्याचा सल्ला दिला होता. ती म्हणाली, मी सुरुवातीला त्याला ते विसरून जाण्यास सांगितले होते आणि ते तसेच राहू देण्यास सांगितले होते. पण राजेशला वाटले की मी पुढे येऊन बोलले पाहिजे कारण मी ते करू शकते.

## मेडिकल स्टोअर्समध्ये 'ते' विषारी औषध दिसले तर लगेच फोन करा

### राज्य सरकारकडून महत्त्वाचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** खोकल्याच्या औषधामुळे विषबाधा होऊन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकरणामुळे सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान या गंभीर प्रकरणी आता महाराष्ट्र सरकारने लहान बालकांच्या आरोग्याच्या पार्श्र्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या अन्न औषध प्रशासन विभागाकडून या प्रकरणीची दखल घेत खबरदारीचा उपाय म्हणून टोल फ्री नंबर सुरू करण्यात आला आहे. कोल्ड्रिप सिरप हे मे २०२५ ते एप्रिल २०१७ या कालावधीतील औषध मेडिकलमध्ये असल्यास तात्काळ टोल फ्री क्रमांकवर माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या औषधामधे डायइथिलीन ग्लायकोल नावाचा विषारी घटक असल्याचं तपासातून स्पष्ट झालं आहे. परिणामी ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, सर्व परवानाधारकांना आणि सामान्य जनतेला कोल्ड्रिफ सिरप (बॅच क्रमांक एसआर-१३) ची विक्री, वितरण किंवा वापर तात्काळ थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, कोल्डरिफ कफ सिरप बनवणाऱ्या कंपनीच्या कांचीपुरम युनिटमध्ये केलेल्या तपासणीत कोल्डरिफ कफ सिरपमध्ये ४८.६% डायथिलीन ग्लायकोल आढळून आले, ज्याचे प्रमाण ०.१% पेक्षा जास्त नसावे. असे नोंदवले जात आहे की डायथिलीन ग्लायकोल अत्यंत विषारी आहे. असा दावा केला जात आहे की, कफ सिरप प्यायल्यानंतर मुलांचे मूत्रपिंड निकामी झाले. ते गंभीर आजारी पडले आणि त्यांचा मृत्यू झाला.

विषारी कफ सिरप पिण्यामुळे होणाऱ्या मुलांच्या मृत्यूची संख्या सातत्याने वाढत आहे. आतापर्यंत मध्य प्रदेशात १४ मुलांचा मृत्यू झाला आहे, तर राजस्थानमध्ये ३ मुलांच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे. मध्य प्रदेशात १४ मुलांच्या मृत्यूनंतर, कोल्ड्रिफ कफ सिरपची चौकशी सुरू आहे. कफ सिरप पिल्यानंतर या मुलांचा मृत्यू का झाला? याचा सर्वांनाच प्रश्न पडला आहे. या मृत्यूंनंतर, मध्य प्रदेशात या सिरपवर बंदी घालण्यात आलीय. तर एका डॉक्टरलाही अटक करण्यात आली आणि उत्पादक कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय.

मध्य प्रदेशच्या छिंदवाडा जिल्ह्यातील १४ लहान मुलांचा नागपूरमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर राजस्थानमध्येही तीन मुलांचा बळी गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

या मुलांना दिलेल्या 'कोल्ड्रिफ' कफ सिरपमुळे दुष्परिणाम झाले असावेत, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि केरळ सरकारांनी तत्काळ निर्णय घेत 'कोल्ड्रिफ' कफ सिरपच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे.

## मला कृषीमंत्रीपद गमवावं लागलं, रोहित पवारांकडे 'तो' व्हिडीओ कुठून आला? न्यायालयात माणिकराव कोकाटेंचा युक्तिवाद; चौकशीची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** ऑनलाइन रमी खेळल्याचा आरोप झाल्यानंतर चर्चेत आलेले राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी आमदार रोहित पवार यांच्याविरोधात दाखल केलेल्या मानहानीच्या दाव्याची आज (६ ऑक्टोबर) नाशिक न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणात कोकाटे यांनी स्वतः न्यायालयात हजर राहून आपली बाजू मांडली.

काही महिन्यांपूर्वी विधान परिषदेच्या सत्रात मंत्री कोकाटे मोबाइलवर 'जंगली रम्मी' खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. या व्हिडिओच्या आधारे आमदार रोहित पवार यांनी थेट त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. कोकाटे यांनी मात्र हा आरोप फेटाळत मी रमी खेळत नव्हतो, मला रमी खेळताच येत नाही अशी स्पष्ट भूमिका घेतली होती. यानंतर कोकाटे यांनी रोहित पवार यांना कायदेशीर नोटीस



पाठवत स्पष्टीकरण मागवले. मात्र, उत्तर न आल्याने त्यांनी नाशिक न्यायालयात थेट अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला आहे.

**कोर्टात मांडलेला मंत्री कोकाटेंचा जबाब काय?**

- माझ्या मोबाईलवर 'जंगली रमी' ची जाहिरात आली होती, ती बंद करताना १५ ते २० मिनिटे लागली. त्याच दरम्यानचा व्हिडिओ काढून आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर अपलोड केला.

- मी विधान परिषदेमध्ये स्पष्ट स्पष्टीकरण दिले. त्यानंतरही रोहित पवार यांनी ट्विट करत बदनामी केली.

- या प्रकारामुळे मला कृषी खात्याचा मंत्रिपद गमवावे लागले, पक्ष आणि वैयक्तिक प्रतिमेला मोठा धक्का बसला.

- व्हिडिओ कोणी आणि कसा काढला, याची चौकशी व्हावी. कारण, रोहित पवार हे विधान परिषद सदस्य नाहीत, तरीही त्यांच्याकडे व्हिडिओ कसा पोहोचला, हे महत्त्वाचे आहे. असा युक्तिवाद माणिकराव कोकाटे यांच्याकडून करण्यात आला.

**कोकाटेंचे वकील डॉ. मनोज पिंगळेंची प्रतिक्रिया**

या व्हिडिओच्या निर्मितीमागे कोणते तंत्रज्ञान वापरले गेले, की तो खरा आहे की नाही, याबाबत न्यायालयीन चौकशी आवश्यक आहे. या प्रकरणातील संपूर्ण सत्य चौकशीनंतर बाहेर येईल, असा आमचा विश्र्वास आहे, अशी प्रतिक्रिया कोकाटेंचे वकील डॉ. मनोज पिंगळे यांनी दिली आहे.

**पुढील सुनावणी ९ ऑक्टोबर रोजी**

या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या प्रकरणात एकीकडे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आक्रमक पवित्र्यात राहिले, तर दुसरीकडे माणिकराव कोकाटे यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावून आपली बाजू मांडण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण झाली आहे. आता पुढील सुनावणीत काय घडते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये द्या

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यासह शेलगाव देशमुख महसूल मंडळामध्ये २५ व २६ जून तसेच २३ व २४ जुलै रोजी ढगफुटी सदृश पावसामुळे आणि त्यानंतर झालेल्या सततच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतीचे आणि पिकांचे नुकसान झाले आहे. सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे शेतजमिनी खरडून गेल्या असून, शेतमाल वाया गेला आहे. यामुळे शेतकऱ्यांबरोबरच शेतमजुरांवरही गंभीर आर्थिक संकट कोसळले आहे.

या पार्श्वभूमीवर शेलगाव देशमुख महसूल मंडळात ''ओला दुष्काळ'' जाहीर करावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. प्रति हेक्टरी ५०,००० शेतकरी मदत, शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी, खरीप हंगाम २०२५ साठी पिक विमा योजना लागू करणे, तसेच शेतमजुरांना प्रति मजूर ३०,००० आर्थिक मदत अशी मागणी करणारे निवेदन आज, ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता, मेहकरचे तहसीलदार निलेश मडके यांच्यामार्फत शासनाला देण्यात आले.

हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात यांचे स्वीय सहाय्यक ॲड. संदीप गवई, आणि माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांना देण्यात आले आहे.

निवेदन देताना उपस्थित प्रमुख व्यक्ती: सरपंच पती दिलीप आखरे, माजी सरपंच भानुदास अजगर,



उपसरपंच भागवत डाखोरे, माजी सरपंच भाऊराव जावळे, पियुष केळे, पुरुषोत्तम लोखंडे, बबन खंडारे, प्रविण ठोकळ, गजानन म्हस्के, गफ्फार शहा, परमेश्वर वच्छे, संतोष कऱ्हाळे, भिकाजी हरमकर, आदिल शहा, शिवप्रसाद खराट, वसंता मानकर, बाबुराव कुसळकर, विष्णु आखरे यांच्यासह अनेक शेतकरी बंधू उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, आतापर्यंत शासनाकडून या भागाकडे फारसे लक्ष दिले गेलेले नाही. झालेल्या नुकसानाची योग्य ती पाहणी करून तत्काळ पंचनामे करण्यात यावेत आणि पीडित शेतकरी, शेतमजुरांना योग्य तो न्याय दिला जावा.

शेलगाव देशमुख महसूल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५०,००० आर्थिक मदत

संपूर्ण कर्जमाफी लागू करावी खरीप हंगाम २०२५ साठी पिक विमा लागू करावा

शेतमजुरांना प्रति मजूर ३०,००० आर्थिक मदत द्यावी या भागातील शेतकरी आणि शेतमजूर यांची स्थिती अत्यंत दयनीय असून शासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देखील काही शेतकऱ्यांनी यावेळी दिला.

# वैचारिक प्रबोधनाचे लोकनाट्य दर्शन: “लग्नाची केली घाई, जीव गेला बाई” ने रसिकांचे हृदय हेलावले!

## दे. माळीच्या ७५ वर्षाच्या समृद्ध वारशाचा तेजस्वी जागर; पांडुरंग कृपा भारूड मंडळाच्या नाट्यप्रयोगाला अभूतपूर्व गर्दी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला परंपरेतील भारुड या सशक्त कला प्रकाराला आधुनिक सामाजिक जाणिवांची जोड देत, श्री पांडुरंग कृपा भारुड भजनी मंडळाने लग्नाची केली घाई, अन् जीव गेला बाई हे कौटुंबिक, हास्य-विनोदी नाटक दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सादर करून वैचारिक मंथन घडवले. पांडुरंग संस्थान येथील रंगमंदिरासमोर आयोजित या प्रयोगाला रसिकांनी उच्चांक गर्दी करत हाउसफुलचा मानदंड प्रस्थापित केला. श्री.पांडुरंग कृपा नवदुर्गा उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या या नाट्यकृतीतून मनोरंजन आणि प्रबोधनाचा दुर्मीळ संगम साधण्यात आला. ज्वलंत विषयांवरील प्रखर भाष्य हे नाटक केवळ विदुषकी पात्रातील करमणूक नव्हते, तर ते माणुसकीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण




करणाऱ्या ज्वलंत सामाजिक समस्यांचे कठोर चित्रण होते. कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, बालविवाह, महिलांचा सासरी छळ प्रकरण, धनलोभाची लालसा आणि स्त्री हत्या यासारख्या विकृत प्रवृत्तींवर या नाटकाने मार्मिक टोला दिला. लोकपरंपरा आणि भारुडाच्या,माध्यमातून करण्यात आलेले हे सडेतोड वैचारिक भाष्य, प्रेक्षकांना हसवून आणि नंतर विचार करण्यास लावून अंतर्मुखतेच्या वाटेवर घेऊन गेले.लोककलावंत जगनाथ चांगाडे यांच्या दिग्दर्शनात कलावंतांचा जिवंत अविष्कार दिग्दर्शक शाहीर जगन्नाथ चांगाडे रवींद्र सुरुशे यांच्या कसलेल्या मार्गदर्शनाखाली या नाट्यकृतीचा जिवंत आणि प्रभावी अविष्कार रंगभूमीवर अवतरला. प्रत्येक कलावंताने आपली भूमिका केवळ साकारली नाही, तर ती जगून दाखवली, यामध्ये उत्कृष्ट भूमिका रवींद्र सुरूशे, डिगांबर भराड, केशव मगर, सिताराम सुरूशे, शिवशंकर जुमडे,संतोष गोरे, मनोहर नखाते, मोहन मगर,योगेश मगर, देवाशिष वाघमारे आदि कलावंतांच्या सहज आणि प्रभावी अभिनयाने नाटकाला उंची प्राप्त झाली. तसेच, शिवशंकर बळी यांनी सूत्रसंचालनाच्या माध्यमातून नाटकातील मध्यस्थीची भूमिका पार पाडत कथानकाची धार अधिक तीव्र केली. अनेक वर्षांनंतर सादर झालेल्या या प्रयोगाची सांस्कृतिक अनुभूती रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली.

**७५ वर्षांच्या समृद्ध लोककलावंतांच्या वारसाचे तेजस्वी प्रतिनिधित्व**

देऊळगाव माळी गावातील कलावंतांची परंपरा हा महाराष्ट्राच्या लोकधारेचा अखंड आणि तेजस्वी वारसा आहे. मागील ७५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात या मातीत अनेक शेकडो निष्ठावान कलावंत होऊन गेले, ज्यांनी आपली कला आणि विचार निरपेक्षपणे समाजमनापर्यंत पोहोचवले. यावेळी या नाटकातील वर्तमान कलावंतांनी याच समृद्ध वारसाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या अभिनयात जी जिवंतता आणि प्रामाणिकता आढळली, ती केवळ कलासाधनेतून नव्हे, तर पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या कलात्मक संस्कारांतून आलेली आहे. त्यांच्या प्रयोगात लोक रंगभूमीची ऊर्जा आणि वैचारिक साहित्याची गांभीर्यता यांचा सुरेख मिलाफ अनुभवायला मिळाला. या भारदस्त लोकनाट्याच्या माध्यमातून, आजच्या कलावंतांनी आपल्या पूर्वसूरींच्या योगदानाचा गौरव करत, लोककलेच्या सामर्थ्यांची आणि प्रबोधनाच्या मार्मिकतेची प्रचिती दिली. या नाट्यप्रयोगाने रसिकांच्या मनाला नुसता स्पर्श केला नाही, तर त्यांच्या संवेदनशील जाणिवांना झंकारून सोडले.

## मेहकर नगरपरिषद निवडणूक २०२५ : आरक्षण सोडत ८ ऑक्टोबरला

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : येत्या २०२५ मध्ये होणाऱ्या मेहकर नगरपरिषद निवडणुकीसाठी विविध प्रवर्गांतील सदस्य पदांसाठी आरक्षण सोडत कार्यक्रम बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सकाळी ११ वाजता, नगरपरिषद कार्यालय, मेहकर येथे पार पडणार आहे.




नगरपरिषद मुख्याधिकारी रामराजे कापरे यांनी दिलेल्या अधिकृत पत्रानुसार, सदर सोडत कार्यक्रमात अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), इतर मागासवर्ग (), इतर मागासवर्ग (महिला) आणि सर्वसाधारण महिलांसाठीचे आरक्षण निश्चित केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी सर्व राजकीय पक्षांचे अध्यक्ष/सचिव, तसेच सर्व नागरिकांना आमंत्रित करण्यात आले असून, त्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

ही सोडत प्रशासकीय पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, आगामी निवडणुकीतील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रतिनिधीत्वावर याचा थेट परिणाम होणार आहे.

## आज नगरपरिषदांची प्रभागनिहाय आरक्षण सोडत नगरपरिषद कार्यालयात सोडत कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी**: महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण) आदेशानुसार जिल्ह्यातील एकूण ११ नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडत बुधवारी दि. ८ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयात काढण्यात येणार आहे.

ही आरक्षण सोडत राज्य निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. यानुसार उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा आणि चिखली या नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. तर उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांच्या अध्यक्षतेखाली सिंदखेड डराजा आणि देऊळगाव राजा नगरपरिषद, उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या अध्यक्षतेखाली मेहकर आणि लोणार नगरपरिषद, उपविभागीय अधिकारी खामगांव यांच्या अध्यक्षतेखाली खामगांव आणि शेगांव नगरपरिषद, उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद यांच्या अध्यक्षतेखाली जळगांव जामोद नगरपरिषद, उपविभागीय अधिकारी मलकापूर यांच्या अध्यक्षतेखाली नांदुरा आणि मलकापूर नगरपरिषदांच्या प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. ही सोडत अनुक्रमे सकाळी ११ व दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश जारी नियोजन करण्याच्या सूचना देखील त्यांनी दिल्या आहेत.

## नेपाळमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल पंतप्रधानांकडून दु:ख व्यक्त

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नेपाळमध्ये मुसळधार पावसामुळे झालेल्या जीवितहानी आणि व्यापक नुकसानाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले. या कठीण काळात नेपाळची जनता आणि नेपाळ सरकारप्रती भारताच्या ठाम समर्थनाचा त्यांनी पुनरुच्चार केला. मोदी यांनी या संकटात आवश्यक त्या सर्व मदतीसाठी भारताची बांधिलकी अधोरेखित करत, भारत संकट काळात एक मित्रवत शेजारी आणि प्रथम प्रतिसाद देणारे राष्ट्र असल्याचे स्पष्ट केले.

## जागतिक कौशल्य स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी**: जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी जागतिक कौशल्य स्पर्धा ही दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. सन २०२६ ची ही स्पर्धा चीनमधील धाई येथे होणार असून, या स्पर्धेत जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रवासाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कॉन्सिल तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर स्किल कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून निवड झालेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा प्रमुख निकष असून, ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा नंतरचा असणे आवश्यक आहे. तर १३ क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा नंतरचा असावा. जागतिक कौशल्य स्पर्धेच्या नावनोंदणीसाठीची अंतिम मुदत आता १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे पात्र व इच्छुक उमेदवारांनी skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आपली नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

## कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्यावा; नागपूरमध्ये बेमुदत आंदोलन सुरू, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची भेट

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : राज्यभरातील महसूल विभागातील अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळावा, या मागणीसाठी महाराष्ट्र कोतवाल संघटनेने नागपूर येथे १३ सप्टेंबरपासून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून न्यायाची प्रतीक्षा करत असलेल्या कोतवालांनी अखेर रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे महसूल प्रशासनातील अनेक महत्त्वाच्या कामकाजांवर परिणाम होऊ लागला आहे.





या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्या कोतवाल बंधू-भगिनींशी संवाद साधला. त्यांच्या समस्यांचा सखोल आढावा घेत, पक्षाच्या वतीने आंदोलनाला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

त्यांच्यासोबत शिवसेनेचे नागपूर ग्रामीण जिल्हाप्रमुख उत्तमभाऊ कापसे, वाहतूक सेना जिल्हाप्रमुख स्वप्निलभाऊ खोरगडे, तसेच प्रसिद्धी उपजिल्हाप्रमुख मंगेश गमे हे देखील उपस्थित होते.

कोतवालांच्या आंदोलनामुळे शासकीय कामांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. दवंडी देणे, शासनाच्या योजनांची माहिती पोहोचवणे, महसूल वसुली, टपाल व नोटिसा वाटप, पीक पाहणी, तसेच तलाठ्यांचे दफ्तर ने-आण करणे यांसारख्या अनेक कार्यांवर थेट परिणाम होत आहे.

कोतवाल संघटनेने अनेक वेळा शासनाकडे आपल्या मागण्यांसाठी निवेदन दिले आहे, मात्र त्याकडे अद्याप दुर्लक्ष होत असल्याने हे आंदोलन हाती घेण्यात आले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, कोतवाल हे महसूल यंत्रणेतील अत्यावश्यक घटक असूनही त्यांना अद्याप शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा नाही.

शिवसेना प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी आंदोलनकर्त्यांच्या भावना ऐकतांना सांगितले, ‘‘कोतवाल हे प्रशासनाच्या पायाभूत यंत्रणेचा भाग आहेत. त्यांचा न्याय्य हक्क हा शासनाने तातडीने मान्य करावा. शिवसेना पक्ष आपल्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे.‘‘

राज्य शासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेत लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी आता वेगवेगळ्या स्तरांवरून होत आहे.

## विविध वृत्त...

### आज बुलढाण्यात दिशा समितीची बैठक केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणार बैठक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी**: केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार ना. प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली उद्या (७ ऑक्टोबर) दिशा समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.

बैठकीत जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यात येणार असून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना व प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीस जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आयटीआयमधील अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचा शुभारंभ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखली येथे कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी**: महाराष्ट्रातील युवकांसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचा नवा अभ्यासक्रम सुरू होत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शॉर्ट टर्म कोर्सेसचा शुभारंभ बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. हा उपक्रम कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या वतीने राबविण्यात येत असून, राज्यातील युवकांना विविध अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून कौशल्य विकास आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. या निमित्ताने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखली येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षण उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. यामुळे युवकांना रोजगारक्षमता वाढविण्यासह स्वयंरोजगाराच्या संधीही प्राप्त होणार आहेत. या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा चिखली तालुक्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चिखलीचे प्राचार्य बी. बी. बेदरकर यांनी केले आहे.

### शासकीय आयटीआय खामगाव येथे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु होणार बुधवारी शुभारंभ ; २१० जागांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी**:महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने खामगाव येथील सद्गुरु श्री अंगारी काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तीन महिन्यांच्या अल्पमुदतीच्या ७ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमांचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. एकूण २१० जागांसाठी प्रवेश उपलब्ध असून, या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणारे, नोकरी करणारे तसेच गृहिणी सर्व इच्छुक महिला-पुरुष उमेदवारांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध आहे. प्रवेशासाठी केवळ ₹१०० रजिस्ट्रेशन शुल्क आकारले जाणार असून उमेदवारांनी ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष संस्थेत येऊन प्रवेश घेऊ शकणार आहेत. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी खालील संकेतस्थळावर भेट द्यावी: https://msbsvet.edu.in/dvetadmission2025 प्रवेशावेळी उमेदवारांनी आपले शैक्षणिक कागदपत्रे, आधार क्रमांक, छायाचित्र आणि मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहनसंस्थेचे प्राचार्य व्हि.बी. बचाटे, उपप्राचार्य व्हि.व्हि. काळे यांनी केले आहे. या संस्थेत पुढील ७ अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू होत आहेत:

1. Electrician Domestic Solution
2. CNC Programmer
3. Fashion Designer
4. Light Motor Vehicle Driver
5. Solar Panel Installation Technician
6. Two Wheeler Service Assistant
7. Digital Mitra